# माहेर

त्यादिवशी चॅनेल सर्फिंग करता करता कुठल्याशा मराठी चॅनलवर 'माहेरची साडी' हा सिनेमा चालू होता. वाटलं किती जुना आहे हा, पण अजूनही पुनर्प्रसारित होतोय म्हणजे कुठेतरी कोणीतरी पाहातच असेल ना ? आता विषयात इतका जिव्हाळ्याचा आहे की काही विचारता सोय नाही. असं पण माहेरची प्रत्येक गोष्ट आपल्याला किती प्यारी असते, मग ती साडी असो वा गाडी !!

आता माझंच बघा ना, आजही माहेरी जायचं म्हटलं की प्रत्यक्ष जाण्याआधी मी मनाने आधी तिथे जाऊन पोहोचलेले असते.
“अगं माहेरी असल्यासारखीच तर इथे वावरतेस, अजून तिथे जाऊन काय करणार आहेस ?“
असे नवऱ्याचे इशारेवजा टोमणे ऐकून ते न ऐकल्याची कला मी आता एव्हाना साध्य केली आहे.

माझं माहेर ठाण्याला, पूर्वी मी गोरेगावला राहायचे आणि आता पुण्याला असते. So लग्न झाल्यापासून तसं ते मला दुरुनच खुणवायचं पण त्याची आठवण मात्र कायम येते. ते घर, त्याच्या भोवतालचा परिसर, ती पायाखालची वाट, सगळं कसं ना सतत आपल्या बरोबर असतं. घराजवळच सिद्धिविनायकाचे देऊळ असल्याने तेथील वातावरणात एक प्रकारची प्रसन्नता असायची, दिवसाच्या कोणत्याही वेळेला ऐकू येणारा तो घंटानाद आणि संध्याकाळच्या आरतीचे बोल कानी पडले की बाप्पासमोर आपोआप हात जोडले जायचे.

काळानुसार आता भावाने घरातील सजावटीत बदल केलाय पण स्वयंपाकघरातील ज्या भिंतीला टेकून मी अभ्यास केला ती मात्र अजून तशीच आहे. जी गोष्ट भिंतीची तीच गोष्ट माणसांची ! अजूनही घरातील प्रत्येक जण मी येणार म्हणून वाट पाहत असते, त्यात माझ्या छोट्या भाचीचा पण अपवाद नाही .

माहेरी जाणं हे फक्त जाणं नसतं तर ते अनुभवणं असतं.  पूर्वी मी माहेरी आले की माझ्या आवडीचे मासे आणायला बाबा मला स्वतः घेऊन जात तर आता माझा भाऊ मी येण्याआधीच ते आणून ठेवतो.

माझं माहेरपण निगुतीने करणाऱ्या आईला पाहिलं की तिचं राहून गेलेलं माहेरपण डोळ्यासमोर येतं. आजीच आमच्याकडे असल्याने आई कधी कुठे गेलीच नाही मग वर्षातून एकदा तरी तिला माझ्याकडे

चार दिवस रहायला नेऊन तिचं माहेरपण मी करायला लागले. सुदैवाने सासू सासरे समंजस असल्याने तिलाही कधी माझ्याकडे संकोच वाटला नाही .

प्रत्येक वारकऱ्याला जसं माझं माहेर पंढरी वाटतं तसं प्रत्येक सासुरवाशिणीला आपलं माहेर पंढरीच वाटतं, भले त्यांचे विठ्ठल रखुमाई आज तिथे असतील नसतील पण त्यांच्या आस्तित्वाने पावन झालेली ती जागा प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षपणे तिथे असतेच .

प्रत्येक विवाहितेला अढळपदासारखं प्राप्त झालेलं माहेर तिचा ध्रुवताराच असतो. चमचमता, लखलखता आणि अंधारात वाट दाखवणारा !

म्हणूनच मी माहेराला म्हणते,

तुझ्या आठवणी चांदण्या होती
रात्र होताच नभी चमचमती ।
तेथे असे एक हळवा कोपरा
जो होई माझा सगा सोयरा ।
वाट हरवतां माझी कधी
अवचित सापडतो ध्रुवतारा !!!!!!

**शिल्पा इनामदार आर्ते**